27/2017

sm - 2017-18

330

330

# अश्रूंची झाली फुले

## स्वरूप आणि समीक्षा

डॉ.सविता पवार

श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
१, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर
फोन : ०७१२-२५२४४९८, ९८८१७१८२२४

9 789384 642747

ISBN 978-93-84642-74-7

Scanned by TapScanner

# अश्रूंची झाली फुले
## (स्वरूप आणि समीक्षा)

डॉ. सविता पवार
एम.ए. (मराठी वाङ्मय), नेट, पीएच.डी.
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,
मेहकर, जिल्हा बुलडाणा

Smt. Sindhutai Jadhav ... Mehkar
330

श्री साईनाथ प्रकाशन
१, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर – १०

Scanned by TapScanner

- प्रकाशन क्र. ३०४
- अश्रूंची झाली फुले
  (स्वरूप आणि समीक्षा)
  ISBN-978-93-84642-74-7
- प्रकाशक
  ललिता पुराणिक
  श्री साईनाथ प्रकाशन
  १, भगवाघर कॉम्प्लेक्स
  धरमपेठ, नागपूर – ४४० ०१०
  फोन – (०७१२) २५२४४९८, २५२७७९८
- प्रथमावृत्ती – २१ सप्टेंबर २०१७
- लेखिका
  डॉ. सविता पवार
  अद्वैत, बालाजी नगर, मेहकर
Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330
- अक्षर जुळवणी
  संपदा क्रिएशन्स, नागपूर
- मुद्रक
  सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर
- किंमत – ₹ १००/–

माझे वडील

स्व. माधवराव गोविंदराव पवार

यांना भावपूर्वक अर्पण.

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

Scanned by TapScanner

## मनोगत

आपल्या हातून पुस्तकरूपाने लेखननिर्मिती व्हावी, अशी अनेक वर्षांपासून म
एक इच्छा राहत आली आहे. सुरुवात कथेच्या रूपाने होईल असे वाटले होते, प
समीक्षेने झाली याचे समाधान मला आहे. 'अश्रूंची झाली फुले : स्वरूप आणि समीक्ष
माझे पहिले पुस्तक श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर यांनी प्रकाशित केले याचा मला म
आनंद होत आहे.

श्री गणेशावर माझी नितांत श्रद्धा. त्याच्या आगमनाच्या दिवशी माझ्या या पुस्त
लेखन पूर्ण झाले. माझ्यासाठी ही अतीव सुखाची गोष्ट आहे. वसंत कानेटकरांच्या नाटव
समीक्षात्मक लेखन करण्याचा हा मी एक प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न कितपत यश
झाला हे वाचकांनी ठरवावे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाने बी.ए.भाग
मराठी वाङ्मय यासाठी वसंत कानेटकरांचे हे पुस्तक अभ्यासाला ठेवले आहे.

श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान या आमच्या महाविद्यालयात २००
२००५ या कालावधीत, प्राचार्य पदावर असलेल्या डॉ. विजया देशपांडे, यांच्या
माझ्या मनात आजही नितांत आदर आहे. त्यांचा स्नेह मला कायम मिळत आला अ
अनेक वेळा त्यांनी मला लेखनाविषयी आठवण करून दिली. त्यांच्यामुळेच श्री साई
प्रकाशनच्या प्रकाशिका ललिता पुराणिक यांच्याशी ओळख झाली. आमची प्रत्य
भेट नसली तरी त्या अतिशय व्यग्र असलेल्या आणि आपण काय प्रकाशित करीत आ
याची पुरेपूर जाण असलेल्या प्रकाशिका आहेत याची मला कल्पना आली. 'अश्रूंची झ
फुले' या वसंत कानेटकरांच्या नाटकावर मी समीक्षा लिहावी, असा मनोदय त्यांनी माझ्या
व्यक्त करून माझ्याविषयी पूर्ण विश्वास दाखविला. त्या विश्वासाला सार्थ करण्याची जबाब
माझी होती. पुस्तक पूर्ण झाल्यानंतर त्यांना कुठेच फेरबदल करावासा वाटला नाही, या
भरून पावले. या पुस्तकाच्या निमित्ताने दोघींचेही ऋण मी व्यक्त करते.

– सविता प

अद्वैत, बालाजी नगर,
मेहकर
दि. २५ ऑगस्ट २०१७ (गणेश चतुर्थी)

# अश्रूंची झाली फुले : स्वरूप आणि समीक्षा

## १. मराठी नाटकाचा इतिहास

प्रस्तावना : नाटक हा स्वयंपूर्ण वाङ्मय प्रकार आहे. त्याच्या रचनेची काही विशिष्ट
त आहे. कथा, कादंबरी आणि कविता याप्रमाणेच नाटक हा लोकप्रिय असा वाङ्मय
र आहे. नाटक लिहिताना नाटककाराला वाचक आणि प्रेक्षक या दोन्ही दृष्टीने विचार
वा लागतो. काळाच्या ओघात नाटकाच्या स्वरुपात बदल होत गेला आहे. मराठी
चवाङ्मयाचा दीडशे–पावणेदोनशे वर्षांचा इतिहास आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक,
कृतिक जीवनात जसजशी स्थित्यंतरे झालीत, तसतशी मराठी नाट्यवाङ्मयात देखील
त्यंतरे घडून आलीत.

मराठी नाटकाचा प्रारंभ विष्णूदास भाव्यांपासून मानण्याचा प्रघात आहे. सुरुवातीची
के ही पौराणिक धर्तीवरची होती. रामायण, महाभारत, पौराणिक कथाभागातील
दा प्रसंग निवडून त्यावर नाटके रचली जात. त्यानंतर हळूहळू सामाजिक विषयांवरही
के आली. ऐतिहासिक घटनाप्रसंगांवरही नाटके लिहिली गेली. सुरुवातीच्या काळातील
टकांमध्ये बुकीश नाटकांचाही उल्लेख करता येईल. मराठी नाटकाचा प्रारंभकाळ हा भरीव
णि रोमहर्षक आहे. त्याचा आणि या काळातील नाटकांच्या वैशिष्ट्यांचा विचार
पण येथे करणार आहोत.

ष्णूदास भावे :

सांगलीचे अधिपती श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी कर्नाटकातून आलेल्या 'भागवत'
टकमंडळीचे काही खेळ पाहिले होत व अशा प्रकारचे खेळ आपल्या संस्थानात व्हावे
शी इच्छा त्यांनी विष्णूदास भावे यांना बोलून दाखवली होती. त्यांच्या प्रेरणेवरून विष्णूदास



Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

Scanned by TapScanner

सी.आय.डी. मध्ये आहे आणि सोनेरी टोळीच्या नायकाला पकडण्यासाठी तो येथे आलेला आहे, हे कळताच विद्यानंद गांगरून जातो. गेल्या तीन वर्षात विद्यानंद आणि लाल्या पार बदलून गेले आहेत. विद्यानंदावर पैशांच्या अफरातफरीचे वॉरंट आल्यावर झालेल्या तुरुंगवासानंतर विद्यानंद एक गुन्हेगाराच्या रूपात समोर येतो. तर वाईट मार्गावरून चाललेला लाल्या विद्यानंदाच्या संपर्कात आल्यानंतर बदलला आहे आणि या तीन वर्षांच्या काळात सबइन्स्पेक्टरच्या कोर्ससाठी निवड होऊन त्याची सी.आय.डी. मध्ये नेमणूक झालेली दिसते. या काळात ताठ मानेने त्याने नोकरी केली आहे, त्यासाठी त्याला वरिष्ठांचा छळ, सहकाऱ्यांचा रोषही पत्करावा लागला. सगळ्या दिव्यांतून तो तावून सुलाखून निघाला आहे.

विद्यानंद आणि सुमित्रा यांच्याविषयी त्याच्या मनात नितांत आदर आहे. विद्यानंदाने दिलेली प्राजक्ताची फुले त्याने अजूनही जपून ठेवली आहेत. विद्यानंद लाल्याला सल्ला देतात की, तो ज्या बदमाशाला पकडण्यासाठी आला आहे, तो महाधूर्त आहे. त्याच्या नादाला न लागता त्याच्याकडून जे काही पैसे मिळतात ते घे आणि गप्प राहा. पण लाल्या बधत नाही. सुमित्रा विद्यानंदाला म्हणते, 'तुम्हीच जन्माला घातलेल्या या सूर्याकडे एकदा तरी धीटपणाने डोळे उघडून पाहा.' लाल्या नंतर लगबगीने जायला लागतो पण विद्यानंद त्याचा हात पकडून 'आपण हा गुंतासोडवू' असे म्हणतात. लाल्या घाईत असतो, त्याला विद्यानंदाचे बोलणे कळत नाही. शंभूमहादेव दिसताच त्याला तो पकडतो. सोनेरी टोळीचा नायक हा विद्यानंदाचा बालमित्र असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटते. 'त्याचा हात सोड' म्हणून विद्यानंद लाल्याला दम देतात पण तो बधत नाही. शंभूमहादेवाच्या हातात हातकड्या टाकून इन्स्पेक्टर घेऊन जाऊ लागतात. लाल्याही जातो. यावेळी विद्यानंदाची झालेली घालमेल पाहण्यासारखी आहे. एकीकडे 'शहाणा असशील तर पैसे घे' असा सल्ला देतो. तर शंभूमहादेवाला पकडू नये असे त्याला वाटते पण प्रत्यक्षात त्याला पकडत असताना आणि घेऊन जातानाही तो गुन्हा कबूल करीत नाही. आधी तर 'मित्रप्रेमासाठी' तो गुन्हा कबूल करायला तयार आहे, असेही चित्र दिसते. नंतर तो कबूल करतो की 'सोनेरी टोळीचा नायक' तो स्वतः आहे. आता धक्का बसण्याची पाळी लाल्याची आहे. त्याचा यावर विश्वासच बसत नाही. सुमित्रेच्या एकंदर आविर्भावावरून त्याची खात्री पटते. तेव्हा तो कासावीस होतो, हुंदके देऊन रडायला लागतो. संताप, दुःख, वेदना, हताशपण इ. भावनांनी त्याची तडफड ही स्वाभाविक वाटते. विद्यानंदाचे रंग बदलणे मात्र कुठेतरी कृत्रिमपणाचे वाटते. विद्यानंदाचे हृदयपरिवर्तन झाले आणि त्यामुळे त्याने गुन्हा कबूल केला असे वाटत नाही. कारण यानंतरही विद्यानंद लाल्यावर केलेल्या उपकाराची जाणीव करून देतो. 'माझी माणसं सोड आणि मला फक्त अर्ध्या तासाची मुदत दे. तुझ्यावर कोणतही किटाळ येणार नाही याची मी तुला हमी देतो,' असे तो लाल्याला म्हणतो आणि त्याचवेळी नोटा काढून त्याला दाखवतो. लाल्या बधत नाही हे पाहून सुमित्रेकडे पाहून तरी त्याने आपला विचार बदलावा असे त्याला वाटते. सुमित्रा लाल्याला धीर देऊन, माझ्या डोळ्यांतील अश्रू पाहून विरघळू नकोस असे सांगते. लाल्या आपला प्रक्षोभ आवरीत विद्यानंदाला हातकड्या घालू पाहतो तेव्हा विद्यानंद एकदम रंग बदलतो. सुटण्याचीच धडपड करायची असती तर यापूर्वीच मी शिताफीने पसार झालो असतो असे म्हणून विद्यानंद लाल्याची मी सत्त्वपरीक्षा घेतली असे सांगतो. पण ते तितकेसे खरे वाटत नाही.

लाल्याच्या सत्त्वपरीक्षेचा क्षण हाच विद्यानंदाच्या पुनर्जन्माचा क्षण आहे, असे कानेटकरांनी दाखविले आहे. विद्यानंदाला त्याच्या श्रद्धा परत मिळाल्या, तेव्हा प्रायश्चित्त भोगूनच ह्या श्रद्धा आता जागविल्या पाहिजेत असे त्याला वाटते. या क्षणी लाल्या, विद्यानंद आणि सुमित्रा तिघांच्याही अश्रूंची फुले झाली आहेत, असे म्हणून हातात हातकड्या घातलेल्या विद्यानंदाला पोलिस इन्स्पेक्टर घेऊन जातात. विद्यानंदाचे स्वच्छपणे हृदयपरिवर्तन न दाखविता तो अनेक आढेवेढे घेऊन प्रायश्चित्त घ्यायला तयार झाल्याचे दिसते.

अंक तिसऱ्याच्या या दुसऱ्या प्रवेशात अनेक नाट्यमय घडामोडी घडतात. नाटकातील सर्व व्यक्तिरेखा येथे भेटतात. विद्यानंद विमानतळावर आला आहे, काही क्षणातच ध्यानीमनी नसताना तेथे शाम आणि आरोळे, क्षीरसागर येतात. शाम हा कायम वास्तव्यासाठी अमेरिकेला जाणार असल्याची माहिती मिळते. बऱ्याच काळानंतर विद्यानंद आणि शाम समोरासमोर आलेले आहेत. त्यानंतर लगेच सुमित्रा प्रवेशते. तिला आपल्या नवऱ्याला परत मिळवायचे आहे. विद्यानंद आणि सुमित्रा यांच्यात संवाद चालू असताना लाल्याचे अचानकपणे तेथे आगमन होते. लाल्या हा पूर्वीचा लाल्या राहिला नाही. तर तो एक कर्तव्यदक्ष, निडर पोलिस इन्स्पेक्टर आहे, सी.आय.डी.मध्ये त्याला बढती मिळाली आहे. विद्यानंदाच्या श्रद्धा त्याने जागविल्या आहेत. अशा लाल्याला गुन्हेगार विद्यानंदासमोर कौशल्याने उभे करून कानेटकरांनी प्रसंगाला नाट्यमयता आणली आहे. पुढे काय होणार? या आपल्या मनातील अनेक प्रश्नांचे निरसन या प्रवेशात होते. नाटकाचा आशादायी शेवट आपल्या मनाला शांत करतो.

■■■

Coordinator - IQAC
Smt. Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana
Smt.Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330